# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.३१/०१/२०२४

**“हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना” चा उद्घाटन सोहळा संपन्न**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन तसेच मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार प्रत्येक तालुक्यामध्ये “हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना” व “आयुष्मान आरोग्य मंदिर” सुरु करणे या उपक्रमांतर्गत आज दि.३१ जानेवारी २०२४ रोजी वसई विरार महानगरपालिका हद्दीतील मनवेलपाडा मैदान, मनवेलपाडा, विरार पूर्व येथे “हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना”चे उद्घाटन मा.आमदार श्री.क्षितीज ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच कुंभारपाडा, विरार (पूर्व) येथे आपला दवाखाना व मजेठीया नाट्यगृह, नालासोपारा येथे आयुष्मान आरोग्य मंदिर सुरु केल्याची उद्घोषणाही यावेळी करण्यात आली. उपक्रमाअंतर्गत शासनाच्या १५ व्या वित्त आयोगामार्फत महानगरपालिका क्षेत्रात ६५ आरोग्यवर्धिनी केंद्र व १५ आपला दवाखाना मंजूर असून यापैकी १० आयुष्मान आरोग्य मंदिर व ०५ आपला दवाखाना सुरु करण्यात आले असून टप्प्याटप्प्याने महानगरपालिका क्षेत्रात आपला दवाखाना व आयुष्मान आरोग्य मंदिर महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात येत आहेत.

“हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना” स्थापनेमुळे परिसरातील नागरिकांना हिमोग्लोबिन, मलेरिया चाचणी, युरिन प्रेग्नन्सी रॅपिड टेस्ट, युरिन डिपस्टिक (युरिन अल्ब्युमिन व शुगर), आर.बी.एस, डेंग्यू चाचणी, थुंकीचे नमुना संकलन, बाह्य रुग्ण तपासणी (OPD) इ.सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आपला दवाखाना मध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, बहुद्देशीय कर्मचारी, मदतनीस इ. उपलब्ध राहतील. “हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना” यामधील आरोग्य सेवेचा लाभ सर्व गरजू नागरिकांनी घ्यावा असे आवाहन मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार महोदयांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास मा.आमदार श्री.क्षितीज ठाकूर, मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त श्री.अजिंक्य बगाडे, महानगरपालिकेचे माजी सभापती, माजी नगरसेवक, माजी नगरसेविका, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार, मान्यवर नागरिक, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी इ.उपस्थित होते.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**